**महावितरण**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**CIN : U40109MH2005SGC153645**

**मासं/रवका/न.क्र.९/०७८३६**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
दिनांक: **०४.०३.२०२६**

# परिपत्रक

**विषय : म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील कर्मचाऱ्यांच्या गणवेश शिलाई खर्च प्रतिपूर्तीची देयके सादर करतांना वस्तु व सेवाकर (G.S.T.) ची अट रद्द करण्याबाबत.**

**संदर्भ** : १. संहिताबध्द सा.आ.क्र.१ दि.३१.१०.१९७२.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.६८९ दि.०४.०३.२०२५.

*****

म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील गणवेश पात्र कर्मचाऱ्यांना संहिताबध्द सा.आ.क्र.१ दि.३१.१०.१९७२ अन्वये गणवेश शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्तीची तरतुद करण्यात आली आहे. या तरतुदीं अंतर्गत गणवेश शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या रक्कमेमध्ये प्रशासकीय परिपत्रक क्र.६८९ दि.०४.०३.२०२५ नुसार वाढ करण्यात आली आहे. तसेच सदरच्या खर्चाच्या प्रतिपूर्ती करीता सादर करण्यात येणाऱ्या देयकामध्ये वस्तु व सेवाकराचा (G.S.T.) समावेश असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

२. याप्रकरणी कर्मचाऱ्यांना शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके वस्तु व सेवाकरासह (G.S.T.) सादर करतांना येणाऱ्या अडचणी व या अनुषंगाने प्रतिपूर्ती देय करतांना येणाऱ्या समस्या विचारात घेउन कर्मचाऱ्यांच्या गणवेश शिलाई देयकांमध्ये वस्तु व सेवाकराचा (G.S.T.) समावेश असणे ही अट रद्द करण्याची बाब व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती.

३. या अनुषंगाने, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.६८९ दि.०४.०३.२०२५ मधील गणवेश शिलाई खर्चाच्या प्रतिपूर्ती बाबतची देयके वस्तु व सेवाकरासह (G.S.T.) सादर करण्याची अट रद्द करण्यात येत आहे. तथापि, सदर प्रशासकीय परिपत्रकातील इतर अटी व शर्ती अबाधित राहतील. ही सुधारीत तरतूद गटवर्ष २०२४-२६ पासून लागू राहील.

४. यास्तव, सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, प्रशासकीय परिपत्रक क्र.६८९ दि.०४.०३.२०२५ मधील तरतुदींनुसार कर्मचाऱ्यांकडून गटवर्ष २०२४-२६ मध्ये सादर करण्यात आलेली व यापुढे सादर होणारी गणवेश शिलाईच्या प्रतिपूर्तीची देयके उपरोक्त सूचना विचारात घेउन अदा करण्यात यावीत.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(मासं)/(प्रकल्प)/(वाणिज्य) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (वित्त व लेखा)/(वितरण)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं)/(सुवअं)/ म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण)/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.